दूरध्वनी क्र. :- ०२१६९-२५२१२४ ई-मेल –bdokhandala@gmail.com

**हागणदारीमुक्तीसाठी विशेष मोहिम**

**तात्काळ कार्यवाही**

जानं/पंसखं/स्वभामि/कावि/ /२०१९

दिनांक- ०५/१२/२०१९

प्रति,

ग्रामविकास अधिकारी/ग्रामसेवक
ग्रामपंचायत -----------------(सर्व)
ता. खंडाळा जि. सातारा

विषय – ग्रामिण भागात संपुर्ण स्वच्छता व हागणदारीमुक्तीसाठी विशेष मोहिम राबविणेबाबत.

संदर्भ – १)मा. अप्पर सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन यांचे पत्र दि. १४/०८/२०१९

२) मा. प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग व मा. प्रधान सचिव पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे अ.शा.पत्र क्रं/स्वभामि/२०१९/ प्र.क्र.३८४/पा.पु१६ दि. २२/११/२०१९

३) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी जि. प. सातारा यांचेकडिल पत्र क्रं/जाक्रं/जिपसा/स्वभामि/६८५ दि०४/१२/२०१९

उपरोक्त विषयास कळविणेत येते कि ग्रामिण भागामध्ये संपुर्ण स्वच्छता व हागणदारीमुक्तीसाठी गावस्तरावर विशेष मोहिम राबविणेबाबतच्या सुचना वरील संदर्भिय पत्रान्वय या कार्यालयास प्राप्त झालेल्या आहेत. गावातील शौचालय नसलेल्या कुटुंबांचे सर्व्हेक्षण करून वैयक्तिक शौचालय बांधणेसाठी त्यांना प्रवृत्त करून गाव १०० हाणदारीमुक्त करणेबाबत **सरपंचाना** आवाहन करणेत यावे.

१) ग्रामसेवकांनी ग्रामपंचायतींमधील अदयाप वैयक्तिक शौचालय सुविधा उपलब्ध नसलेली कुटुंबे निश्चित करावी.

२) गावस्तरावर नोटीस फलक, दवंडीव्दारे, प्रसिध्दी करावी व वाढीव कुटुंबांना गृहभेटी देवून वैयक्तिक शौचालय बांधकाम करणेसाठी व हागणदारीमुक्तीसाठी कुटुंबप्रमुखांना आवाहन करावे.

३) नव्याने शौचालय बांधकाम केलेल्या लाभार्थ्यांना स्वच्छ भारत मिशन किंवा जागतिक बँक अर्थसहाय्यित कामगिरी आधारे प्रोत्साहन अनुदान देणेची अंतिम दिनांक **३१ डिसेंबर २०१९** पर्यंत आहे.

४) नव्याने शौचालय बांधकाम केलेल्या कुटुंबप्रमुखांची एसबीएम जी – एमआयएस वर नोंद करून जिओ टॅगिंग करणेत यावे.

**नव्याने शौचालय बांधकाम केलेल्या पात्र कुटुंबांची यादी सादर करताना खालील निकष विचारात घेणेत यावेत.**

ICt upload & send link to all gram sevak 4BDO

१) स्वच्छ भारत मिशनच्या(ग्रामिण) मार्गदर्शक सुचनेनुसार लाभार्थ्यांची निवड **प्रवर्गानुसार** करावी.(smf/landless/wh/ph/sc/st/apl/bpl)

२) सन २०१२ च्या पायाभुत सर्व्हेक्षणात व वाढीव कुटुंबांच्या यादीत **(एल.ओ.बी.)**समाविष्ठ असलेले लाभार्थी वगळून नवीन नावे घेणेत यावीत.

३) नव्याने शौचालय बांधकाम केलेल्या कुटुंबप्रमुख किंवा अन्य व्यक्तीला यापुर्वी इतर कोणत्याही योजनेतून **(स्वभामि, नरेगा,सीएसआर, घरकुल योजना इ.)** शौचालय अनुदान वितरीत केले नसल्याची खात्री करणेत यावी.

४) संबंधित कुटुंबप्रमुखांना शौचालय अनुदान वितरीत करताना शौचालय हे **१ एप्रिल २०१९ नंतर बांधले असल्याचा दाखला** व यादी संबंधित सरपंच व ग्रामसेवक यांनी सादर करावी.

५) नवीन शौचालय बांधकाम केलेले लाभार्थी स्वतंत्र खातेदार असावेत व शौचालय नोंद ग्रामपंचायतच्या मिळकत नमुना नंबर ८ ला असावी.(नमुना नं. ८ स्वतंत्र असावा.)लाभार्थी अल्पभुधारक शेतकरी असावा.

Scanned by CamScanner

६) नवीन शौचालय बांधकाम केलेल्या शौचालयास **२ शोषखडडे अनिवार्य** असतील, सेप्टीक टाकीचे शौचालय बांधले असल्यास त्या **शौचालयातील मैला पाणी व्यवस्थापनेसाठी शोषखडडे बांधणे बंधनकारक** आहे.

७) आधारकार्ड व रेशनकार्ड छायांकित प्रत यादीसोबत जोडावी

वरीलप्रमाणे प्राप्त निर्देश व लाभार्थी निवड निकषाप्रमाणे पंचायत समिती खंडाळा कार्यालयास दि. १०/१२/२०१९ पर्यंत सादर करावी. नव्याने केलेल्या लाभार्थी यादीला राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय मान्यता मिळालेनंतर सुचना प्राप्त होताच लाभार्थ्यांना अनुदान वितरीत करणेत येईल

**(माणिकराव बिचकुले)**
गट विकास अधिकारी वर्ग १
पंचायत समिती खंडाळा

प्रत – १) मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी(पा.व.स्व) जि. प. सातारा यांना माहितीसाठी सविनय सादर.
३)श्री. एस. पी. घोलप/श्री. एस. ए. बोडरे वि.अ.(पं.)पं. स. खंडाळा यांना पुढील कार्यवाहीसाठी

पाणी व स्वच्छता
सातारा जिल्हा परिषद,सातारा
सामान्य प्रशासन विभाग
का.प्रशा.अधिकारी आवक क्र.
10 DEC 2019
सहा.प्रशा.अधिकारी
उपमु.का.अ. मु.का.अ.

Scanned by CamScanner